participated in the National Integration Camp. held at
JSS Academy of Higher Education & Research
Sri Shivarathreeshwara Nagara, Mysuru Karnataka.
from $5^{th}$ to $11^{th}$ March 2020.

Dr. Gananatha Shetty Yakkar
State NSS Officer, NSS Cell,
Govt. of Karnataka, Bengaluru

Dr. K L Krishna
NSS Programme Co-ordinator,
JSS University, Mysuru

Dr. B Manjunatha
Registrar
JSS University, Mysuru

Certificates for Securing Second Place in GROUP DANCE event

during National Integration Camp, Mysore, Karnataka


JSS ACADEMY OF HIGHER EDUCATION & RESEARCH (DEEMED TO BE UNIVERSITY) MYSURU

Government of Karnataka
YOUTH EMPOWERMENT AND SPORTS DEPARTMENT
&
JSS ACADEMY OF HIGHER EDUCATION & RESEARCH, MYSURU
National Service Scheme
Ek Bharath Shreshtha Bharath
NATIONAL INTEGRATION CAMP

Certificate

This is to certify that

Mr/Ms/Mrs/Dr/ RUSHIKESHAATHAUNG. KOLHAPURE of ART & COMMERCE COLLEGE, MADHA Secured SECOND Place in the event GROUP DANCE during National Integration Camp. held at JSS Academy of Higher Education & Research Sri Shivarathreeshwara Nagara, Mysuru Karnataka, from 5th to 11th March 2020.

Dr. Gananatha Shetty Yakkar
State NSS Officer, NSS Cell,
Govt. of Karnataka, Bengaluru

Dr. K L Krishna
NSS Programme Co-ordinator,
JSS University, Mysuru

Dr. B Manjunatha
Registrar
JSS University, Mysuru


JSS ACADEMY OF HIGHER EDUCATION & RESEARCH (DEEMED TO BE UNIVERSITY) MYSURU

Government of Karnataka
YOUTH EMPOWERMENT AND SPORTS DEPARTMENT
&
JSS ACADEMY OF HIGHER EDUCATION & RESEARCH, MYSURU
National Service Scheme
Ek Bharath Shreshtha Bharath
NATIONAL INTEGRATION CAMP

Certificate

This is to certify that

Mr/Ms/Mrs/Dr/ RAUT SACHIN HANUMANTH of ART & COMMERCE COLLEGE, MADHA. Secured SECOND Place in the event GROUP DANCE during National Integration Camp. held at JSS Academy of Higher Education & Research Sri Shivarathreeshwara Nagara, Mysuru Karnataka, from 5th to 11th March 2020.

Dr. Gananatha Shetty Yakkar
State NSS Officer, NSS Cell,
Govt. of Karnataka, Bengaluru

Dr. K L Krishna
NSS Programme Co-ordinator,
JSS University, Mysuru

Dr. B Manjunatha
Registrar
JSS University, Mysuru

# Special Camp 2017-18 at Uplai (BK)



...स्थत शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालय माढा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने उपळाई बुद्रुक (ता. माढा) येथे श्रमसंस्कार शिबीर उत्साहात पार पडली. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच समाजसेवेची भावनाही वृध्दींगत झाली. आठवडाभराचे हे श्रमसंस्कार शिबीर विद्यार्थ्यांसाठी सुसंस्कारमय ठरले. महाविद्यालयातील ५० स्वयंसेवक व स्वयंसेविकांनी यामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. शिबिरातील दररोजची सकाळ यातील प्रत्येकालाच नवीन काहीतरी शिकविणारी होती. स्वयंशिस्त अन् श्रमसंस्काराचे धडे खऱ्या अर्थात त्यांना यानिमित्ताने मिळाले.



# स्वयंशिस्त अन् श्रमसंस्काराचे धडे !



या शिबिराच्या कालावधीत स्वयंसेवक-स्वयंसेविकांना दैनंदिन उपक्रम ठरलेले होते. पहाटे प्रार्थना संपन्न झाल्यावर चहा- नाष्टा घेऊन सकाळी ८ ते दुपारी १ वाजेपर्यंत गावातील विविध भागातील स्वच्छता केली गेली. त्यानंतर दुपारी भोजन केल्यावर सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये सायंकाळी ७ वाजता विद्यार्थी व ग्रामस्थांसाठी विशेष व्याख्यानाची पर्वणी होती. व्यसनमुक्ती, ग्रामस्वच्छता, जलसंवर्धन, पर्यावरण रक्षण, अपत्ती निवारण व व्यवस्थापन, महिला सबलीकरण व सक्षमीकरण या विषयावर डॉ जयंत करंदीकर व साधना करंदीकर, जलतज्ज्ञ अनिल पाटील, तहसीलदार सदाशिव पडदुणे, ॲड. रेखा वाघमारे आदीं वक्त्यांची प्रभावी व्याख्याने संपन्न झाली. पाणी फाऊंडेशनच्या वतीने 'दुष्काळशी दोन हात' या माहितीपटाच्या माध्यमातून पाणी संवर्धनाबाबतची जनजागृती करण्यात आली. स्वच्छता अभियानांतर्गत [illegible] गावासाठी प्रबोधन करण्यात आले. श्रीनागेश्वर विद्यालयाचे विद्यार्थ्यांना सोबतघेऊन शिबिरातील स्वयंसेवक- स्वयंसेविकांनी प्रबोधन रॅली काढली. सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवाणी सर्वांसाठी मने जिंकणारी ठरली.

'एनएसएस'चे हे श्रमसंस्कार शिबीर प्राचार्य पंजाबराव रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, विभागीय समन्वयक प्रा. प्रेमचंद गायकवाड, जयवंत पालकर, स्वाती व्हनकडे, प्रा. दिलीप घोलप, प्रा. प्रविण शिंदे, प्रा. अंकुश घुले यांनी यशस्वीपणे पार पडले.

शब्दांकन : पवन दसंगे

Arts & Commerce College Madha

श्रमसंस्कार शिबिरातील सात दिवस हे माझ्या व्यक्तिमत्व विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरले असे मला वाटते. माझ्यात समाजसेवेची भावना रूढ झाली. त्याचबरोबर एकमेकांच्या सहकार्याने काम नक्की स्वच्छ व सुकर होवू शकते हे या शिबिरातून अनुभवयास मिळाले.
– रोहिणी शिंदे, विद्यार्थीनी

मला लहानपणापासून समाजसेवेची आवड आहे. यासाठी खरा वाव एनएसएसच्या या श्रमसंस्कार शिबिरावेळी मिळला. शिबिरात सात दिवस निष्ठेने समाजसेवा केली. श्रमसंस्काराचे धडे मिळतानाच सांघिक भावना देखील आम्हा सर्वांमध्ये रूजली गेली.
– विद्या शिंदे, विद्यार्थीनी

या श्रमसंस्कार शिबिरातील सात दिवस माझ्या आयुष्यासाठी नवीन पर्वणी देणारे ठरले आहेत. कुठल्या प्रकारचा हेवा- देवा नाही. स्वतःमधील कलागुणांना वाव देण्याचे व्यासपीठ इथे सर्वांना उपलब्ध झाले. एकत्रितपणे काम करण्याचा आनंद वेगळाच असतो, हे अनुभवले.
– सुरज राऊत, विद्यार्थी

संघ भावना, एकोपा, मैत्री, स्वयंशिस्त काय असते याची प्रचिती खऱ्या अर्थाने एनएसएस शिबिरातूनच येते. स्वतःच्या जबाबदारी जाणीव सर्वांना होते. या शिबिराच्या माध्यमातून आम्ही ग्रामस्थांपर्यंत पोहचून त्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.
– कृष्णा राऊत, विद्यार्थी

राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे स्वयंसेवक व स्वयंसेविकांना नियमित शिक्षणाबरोबर स्वतःचा व्यक्तीमत्व विकास साधण्यासाठीचा एक महत्त्वपूर्ण प्लॅटफार्म आहे. प्रत्येकाच्यात दडलेला वैशिष्ट्यपूर्ण कलागुण याठिकाणी प्रकटतो. त्यांच्यातून अष्टपैलू व्यक्तिमत्व तयार होते.
– प्रा. प्रेमचंद गायकवाड, विभाग समन्वयक, एनएसएस



'स्कूल चले हम' असं म्हणत प्रत्येक विद्यार्थी शालेय जीवनात आपलं पाऊल टाकतो. आपल्या मुलानं, मुलींनं शिकून जीवनात खूप मोठं व्हावं, अशी प्रत्येकच आई-बापाची इच्छा असते. त्यासाठी प्रत्येकजण आपल्या मुला- मुलीला शिकण्यासाठी नेहमीच प्रोत्साहीत करतो. पण ग्रामीण भागात आजही शाळाबाह्य मुले पहावयास मिळतात. विशेषतः भटके सामाजिक जीवन जगणाऱ्या कुटुंबातील पाल्यांच्या पदरी शिक्षणासाठी तशी परवड होताना दिसते. विविध साखर कारखान्यांच्या गाळप हंगामावेळी कारखानास्थळी ऊसतोड मजुरांच्या टोळ्या दाखल होतात. या ऊसतोड

## साखर शाळेचं 'यड'




मजुरांच्या मुलाबाळांसाठी शासनाने 'साखर शाळा' सुरू केल्या. त्यामुळे अनेकांना शिक्षणाच्या प्रवाहात सामील होता आले. परंतु काहीठिकाणी साखर शाळा नसतात. अशा परिस्थितीत एका साखर शाळेकडे झेपावणाऱ्या चिमुकल्या पोराची शिक्षणासाठी होणारी परवड अन् तळमळ प्रकटणार आहे एका शॉर्टफिल्ममधून. त्या शॉर्टफिल्मच नाव आहे 'यड'. उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथील ग्रामीण युवा कथाकार आकाश तानाजी चव्हाण याने या शॉर्टफिल्मची निर्मिती केली आहे. विशेष म्हणजे यातील संगीत देखील अस्सल ग्रामीण पध्दतीचं आहे. सिध्देश्वर मुंडे, विष्णू जाधव व इतर कलाकारांनी यात भूमिका साकारल्या आहेत. बाळासाहेब हारदाडे, उमेश रोमन, हरिभाऊ घाडगे, रवी फडतरे, अजय फडतरे, वल्लभ हारदाडे, वृषभ हारदाडे आदींचे सहकार्य लाभले. आकाश चव्हाण याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. एक कथा सत्य परिस्थितीची असलेली 'यड' ही शॉर्टफिल्म सर्वांच्या नक्कीच पसंतीस पडेल या तीळमात्र शंका नाही.

## स्वागत नववर्षाचे

करूया स्वागत नववर्षाचे
नव्या संकल्पाने
करू संकल्प पर्यावरण संवर्धनाचा
करू संकल्प समाज परिवर्तनाचा
करू संकल्प स्वच्छतेचा
करू निश्चय वृक्ष संवर्धनाचा
करूया सुरुवात स्वतःपासून
मग सांगू इतरांना
असे एक एक करत
संपूर्ण समाज होईल सहभागी
होईल सर्वांची भरभराट
करूया स्वागत नववर्षाचे थाटात
– आनंद तांबट, मंगळवेढा



# Special Camp 2019-20 at Uplai (Khurd)

# ‘नॉट मी बट यू’

## विद्यार्थ्यांकडून जपले जातेय सामाजिक भान







उपळाई : राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामध्ये श्रमदान करताना महाविद्यालयीन विद्यार्थी.

**एनएसएस अर्थात राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व विकासाची कार्यशाळा. ‘नॉट मी बट यू’ म्हणजे ‘माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी’ हे ब्रीदवाक्य घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान जपून सेवेसाठी तत्पर असतात. आपले उज्ज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही तरी देणे लागतो म्हणून ‘फूल ना फुलाची पाकळी’ या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे राष्ट्रसेवा करण्याचे कार्य महाविद्यालयीन युवक करीत असतात.**

**- अक्षय गुंड**

राष्ट्रीय सेवा योजनेची अनेक शिबिर आहेत. त्यापैकी सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिर हे सर्वांत महत्त्वाचे आणि श्रमसंस्कार रूजविणारे शिबिर असते. सध्या माढा येथील कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे समाज अनुभवण्यासाठी अन् विधायक कामातून गावाला विकासाच्या दृष्टीने नेण्यासाठी उपळाई खुर्द येथे श्रमसंस्कार शिबिर सुरू आहे.

अलीकडच्या काळात समाजात वेगवेगळ्या विचित्र घटना घडताना आपण पाहत आहोत.

अशा परिस्थितीत आजचा तरुण कुठे तरी भरकटत जाऊ नये म्हणून राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमातून समाजपरिवर्तन करण्याचे कार्य तरुण करीत आहेत. राष्ट्रीय सेवा योजना उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सामाजिक बांधिलकी रुजून स्वयंसेवक तत्पर व सक्षम व्हावा. यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर या दोन उपक्रमांद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्य करीत आहे.

नियमित कार्यक्रमांद्वारे महापुरुषांचे विचार हे जयंती व पुण्यतिथी कार्यक्रमातून घेऊन श्रमदान, युवा सप्ताह, कार्यशाळा, शिबिर, सरकारच्या विविध कार्यक्रमांत सहभागी होतात. श्रमसंस्कारच्या माध्यमातून ग्रामीण भागात युवा तरुणाई एकत्रित येतात.

ग्रामस्थांबरोबर एकत्र काम केल्याने मैत्री, भावना, सहकार्य यातून समाजसेवेचा वसा मिळतो. संस्कारक्षम युवा पिढी घडवणारी खाण म्हणूनच या श्रमसंस्कार शिबिराकडे पाहिले जाते.

या शिबिरातून युवकांचे ग्रामीण संस्कृतीशी नाते जोडले जात असून, त्यामुळे श्रमसंस्कार शिबिरातून श्रमप्रतिष्ठेचे संस्कार तरुणाईच्या मनावर होताना दिसतात.

### कोण काय म्हणाले

**पल्लवी शिंदे, स्वयंसेविका** : शिबिरातून श्रमदानाची आवड निर्माण झाली. प्रबोधनात्मक व्याख्यानातून माझ्या ज्ञानात मोठी भर पडली. आयुष्याची एक मोठी कमाई या शिबिरातून मिळाली.

**हर्षदा खरात, स्वयंसेविका** : श्रमसंस्कार शिबिरातून शिस्त नावाचा संस्कार अनुभवायला मिळाला. मुले-मुली एकत्रित येऊन किती मोठे काम करू शकतात हे प्रत्यक्ष पाहायला मिळाले.

**प्रेमचंद गायकवाड, समन्वयक, एनएसएस, माढा महाविद्यालय** : विशेष श्रमसंस्कार शिबिरातून युवकांच्या कलागुणांना वाव मिळतो. युवकांना सामजिक कार्याची सवय लागते. कॉलेज जीवनात एकदा तरी युवकांनी श्रमसंस्कार शिबिर करावे.

**समाधान काळे, स्वयंसेवक** : सात दिवसीय विशेष शिबिर आमच्यासारख्या युवकांसाठी स्वतःला सिद्ध करण्यासाठी मोठे व्यासपीठ आहे. यातून आमच्या आयुष्याच्या जडणघडणीसाठी मोठा फायदा होत आहे.

**तानेश नाईकवाडे, स्वयंसेवक** : शिबिरातून सामजिक कार्य करण्याची प्रेरणा मिळते. गावातील सार्वजनिक कामे करताना खूप आनंद वाटतो.

## AIDS Awareness

सकाळ » TODAY

» विद्येच्या प्रांगणात



माढा : येथील कला व वाणिज्य महाविद्यालयातील मुलांची तपासणी करताना ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी.

### माढ्यात 'एड्स'वर व्याख्यान

**माढा :** येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात ग्रामीण रुग्णालयातर्फे एड्स जागृतीपर व्याख्यान व आरोग्य तपासणी करण्यात आली. येथील रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व माढा ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने एड्स जागृती या विषयावर व्याख्यान झाले. या वेळी महाविद्यालयातील १२५ विद्यार्थ्यांची एच.आय.व्ही. व आरोग्य तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. नंदकुमार घोळवे यांनी विद्यार्थ्यांना एड्स कारणे परिणाम व घ्यावयाची काळजी याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपस्थित अजिंक्य मोहिते, श्रीकांत कुलकर्णी, वीरेंद्र कांबळे यांनी विद्यार्थ्यांमध्ये एड्सबद्दल जागृती असणे गरजेचे असल्याचे सांगितले. याप्रसंगी महालॅबच्या राजश्री राजगुरू होत्या. प्रा. अशोक कदम अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, पाहुण्यांचा परिचय व स्वागत प्रा. प्रेमचंद गायकवाड यांनी केले. डॉ. जयवंत पालकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. वंदना कवितके यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रा. एस. पी. पैकेकरी, प्रा. नानासाहेब कदम, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## Voters Awareness

### माढ्यात पथनाट्यातून मतदान जागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**माढा:** माढा विधानसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी पथनाट्यातून मतदान जागृती करण्यात येत असून, या पथनाट्याचे उद्घाटन निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी श्रीमती ज्योती कदम यांच्या हस्ते आज माढ्यातील जिल्हा परिषद प्रशालेमध्ये करण्यात आले.

याप्रसंगी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या माध्यमातून आपल्या पालकांपर्यंत म्हणजेच मतदारांपर्यंत २१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या विधानसभा मतदानासाठी आवर्जून मतदान करण्याचा निरोप देण्यात आला. यावेळी मतदारांनी निकोप लोकशाहीयुक्त वातावरणामध्ये आपला मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन कदम यांनी केले. यासाठी निवडणूक प्रशासन सर्वतोपरी काळजी आणि तयारी करत असल्याचे सांगितले.

यावेळी माढा तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मतदान जागृती अभियान प्रमुख मारुती फडके, केंद्रप्रमुख सुरेश माळी, व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धैर्यशील भांगे, सदस्य शेखर म्हेत्रे, मुख्याध्यापक उत्तम यादव, ज्येष्ठ शिक्षक कन्हैयालाल यादव, प्रा. श्रीमती पैकीकर आदींसह सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी रयत शिक्षण संस्थेच्या माढा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मतदान जागृतीपर पथनाट्य सादर केले. यातून मतदानाविषयी जागृती करून योग्य अशा उमेदवाराला मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले.

पथनाट्याचे दिग्दर्शन प्रा. पैकीकर मॅडम, माढा हायस्कूलचे शिक्षक किरण शेलार यांनी तर पथनाट्याचे लेखन शिक्षिका सुवर्णा क्षीरसागर व संगीता क्षीरसागर यांनी केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण राऊत यांनी केले तर आभार भरत डुचाळ यांनी मानले.



माढ्यात मतदान जागृती पथनाट्य सादर करताना विद्यार्थी.

शुक्रवार, २७ सप्टेंबर २०१९ MY सोलापूर पुढारी ३



माढा : प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मुख्याधिकारी चरण कोल्हे. यावेळी उपस्थित प्राचार्य ढेरे.

## शिस्तप्रिय समाजासाठी 'रासेयो' महत्त्वाची : कोल्हे

**माढा (तालुका प्रतिनिधी) :** शिस्तप्रिय समाजासाठी राष्ट्रीय सेवा योजना महत्त्वाची आहे. संवेदनशील समाज निर्माण करून राष्ट्रीय एकात्मता व श्रमप्रतिष्ठा समाजात रुजविणे शक्य होते, असे मत माढा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी चरण कोल्हे यांनी व्यक्त केले. ते माढा येथील रयत शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे हे होते. याप्रसंगी माढा नगरपंचायतीचे स्वच्छ सर्वेक्षण विभागाचे शहर समन्वयक शिवाजी सांगळे यांनी शहरातील स्वच्छतेविषयक जनजागृतीबद्दल माहिती दिली. यावेळी प्राचार्य डॉ. ढेरे म्हणाले की, समाजाला समस्यामुक्त करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नेहमी कार्यतत्पर असते. प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रेमचंद गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संगीता पैकेकरी यांनी, तर आभार प्रा. अशोक लोंढे यांनी मानले. यावेळी प्रा. डॉ. जयवंत पालकर, प्रा. वंदना कवितके, प्रा. नानासाहेब कदम तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकमत सोलापूर, शनिवार, दि. १६ जानेवारी २०१६ ४

## रणदिवेवाडी येथे रासेयोचे शिबीर



रणदिवेवाडी (ता. माढा) महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक वर्ग.

माढा: सोलापूर विद्यापीठ आणि कला व वाणिज्य महाविद्यालयातर्फे रणदिवेवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसांचे जलव्यवस्थापनासाठी युवक या विषयावर शिबीर झाले.

महाविद्यालयातील स्वयंसेवक जलव्यवस्थापनेला अनुसरुन विहीर पुनर्भरण, बोअर पुनर्भरण, शोषखड्डा, बांध-बंधारा निर्मिती, गाव स्वच्छता, गावातील काटेरी झुडपे काढणे अशी श्रमदानाची कामे त्यांनी केली. याबरोबर बौद्धिकसाठी जलसंवर्धन काळाची गरज जलतज्ज्ञ अनिल पाटील व्यसनाधीनता आणि युवक डॉ. जयंत करंदीकर महिला सबलीकरण व सक्षमीकरण, माढा बार असोसिएशनच्या अध्यक्षा ॲड. यशोदा ढवळे महात्मा गांधी विचार सामाजिक बदल व आजचा युवक, धनराज भारती अभिव्यक्ती स्वातंत्र्य, अतुल कदम साहित्य आणि आजचा युवक, प्रा. डॉ. रमेश शिंदे राष्ट्रीय सेवा योजना आणि युवक, प्रा. डॉ. दिलीप पाटील युवकांवरील संस्कार, प्रा. विश्वास व्हनागडे यांचे व्याख्यान झाले. शिबिराचे उद्घाटन धनराज शिंदे यांनी केले. पो. नि . प्रवीण कांबळे, सरपंच विकास रणदिवे, संतोष लोंढे, उत्तम रणदिवे, अमोल चवरे, प्राचार्य पंजाबराव रोंगे, माजी जि. प. सदस्य आनंद कानडे, ग्रा. पं. सदस्य शहाजी साठे, दिगंबर इंगळे, दत्तात्रय रणदिवे, कमलाकर जाधव, श्रीमंत रणदिवे, प्रेमचंद गायकवाड, प्रा. जयवंत पालकर, प्रा. करीम मुल्ला उपस्थित होते. (वार्ताहर)

राष्ट्रीय सेवा योजना
सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबीर
उंदरगांव (2017)

3-2-2017

## माढा महाविद्यालयाचे एनएसएस शिबिर

**माढा, ता. २ :** येथील रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सोलापूर विद्यापीठ यांच्या वतीने माढा तालुक्यातील उंदरगाव येथे सात दिवसीय विशेष श्रमसंस्काराचे शिबिर झाले.

उंदरगावच्या सरपंच चंचलाताई चव्हाण यांनी उद्घाटन केले. शिबिराच्या विषयाला अनुसरून ग्रामस्थांसाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते. प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांचे शाश्वत व सर्वांगीण ग्रामीण विकास, डॉ. जयंत करंदीकर यांचे व्यसनमुक्ती, ग्रामस्वच्छता व आरोग्य, ॲड. रेखा वाघमारे यांचे महिला सबलीकरण व सक्षमीकरण, गटशिक्षणाधिकारी सुहास गुरव यांचे शिक्षण हक्क कायदा व जनजागृती, जलतज्ज्ञ अनिल पाटील यांचे जलसंवर्धन व पर्यावरण रक्षण अशा विविध विषयांवर व्याख्याने झाली. शिबिर यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. पंजाबराव रोंगे, कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रेमचंद गायकवाड, प्रा. जयवंत पालकर, प्रा. स्वाती व्हनकडे व सदस्य प्रा. सतीश घाडगे, प्रा. प्रवीण शिंदे-पाटील यांनी योगदान दिले.

**झटपट बातम्या**

## रासेयोतून युवकांमध्ये राष्ट्रभक्तीची प्रेरणा निर्माण होते : प्रा. धोकटे



**माढा ।** राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे विद्यार्थ्यांची व्यक्तिमत्त्व समृद्ध करणारी चळवळ असून, यातून युवकांना, स्वावलंबन, श्रमसंस्कार व समाजसेवेचे धडे मिळतात. युवकांमध्ये राष्ट्रभक्ती निर्माण होते, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. एम. एस. धोकटे यांनी केले. येथे कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन साजरा करण्यात आला. प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. उपप्राचार्य प्रा. प्रकाश ताकभाते अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस अभिवादन केले गेले. कार्यक्रमास प्रा. प्रेमचंद गायकवाड, प्रा. दिलीप घोलप, प्रा. सतीश घाडगे, प्रा. बी. डी. जाधव आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. प्रेमचंद गायकवाड यांनी तर सूत्रसंचलन डॉ. प्रमोद परदेशी यांनी केले.

दैनिक दिव्य मराठी

दि. २१.१२.२०१८

राष्ट्रीय सेवा योजना उद्घाटन समारंभ

लोकमत

३ डिसेंबर २०१८ | २

## प्रेमचंद गायकवाड यांची निवड



माढा: येथील रयत शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रेमचंद गायकवाड यांची सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागीय समन्वयकपदी नियुक्ती झाली.

त्याबद्दल त्यांचे रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष भाई एस. एम. पाटील, माजी आमदार धनाजीराव साठे, प्राचार्य डॉ. पंजाबराव रोंगे, उपप्राचार्य डॉ. अब्दुलशकुर शेख यांच्यासह आदी मान्यवरांनी अभिनंदन केले. (वार्ताहर)

सोलापूर जिल्हा

न्यूज ब्रीफ

## राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयकपदी गायकवाड

माढा । येथील रयत शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक प्रेमचंद गायकवाड यांची सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागीय समन्वयकपदी नियुक्ती झाली. त्याबद्दल त्यांचे रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष भाई एस. एम. पाटील, माजी आमदार धनाजीराव साठे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पंजाबराव रोंगे, उपप्राचार्य डॉ. अब्दुल शेख तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



सोलापूर जिल्हा | २१

झटपट बातम्या

## कर्मवीरांनी विद्यार्थ्यांत श्रमदानातून शिक्षणाची संकल्पना रुजवली

माढा । रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी श्रमदानातून शिक्षण ही संकल्पना विद्यार्थ्यांच्या अंगी रूजवली. राष्ट्रीय सेवा योजनादेखील समाजातील विविध समस्यांच्या निवारणाचे काम करते, असे प्रतिपादन ठाण्याचे उपायुक्त संदीप भाजीभाकरे यांनी केले. रयत शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना आणि सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने उपळाई बुद्रुक येथे आयोजित सातदिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पंजाबराव रोंगे होते. कार्यक्रमास सरपंच मनोहर गायकवाड, लक्ष्मण जाधव, बापूसाहेब आखाडे, संजय नागटिळक, रमण शेटे, शाहू आखाडे, रामचंद्र माळी, अण्णासाहेब देशमुख, नामदेव जाधव, दगडू शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो प्रमुख प्रा. प्रेमचंद गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रमोद परदेशी यांनी केले. आभार प्रा. प्रवीण शिंदे यांनी मानले.

दैनिक सकाळ...

राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबीर समारोप समारंभ...

दि. २५.१२.२०१८

# राष्ट्रीय सेवा योजनेतच सुप्तगुणांना वाव

## दादासाहेब साठे; उपळाई बुद्रूक येथे सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

उपळाई बुद्रूक, ता. २४ : राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना वाव मिळतो. स्वयंसेविकांनी स्वच्छता जनजागृतीसाठी केलेले श्रमदान कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष दादासाहेब साठे यांनी केले.

उपळाई बुद्रूकमध्ये रयत शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालय माढा व सोलापूर विद्यापीठ यांच्यातर्फे आयोजिलेल्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या निरोप समारंभात ते बोलत होते.

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे संचालक सीताराम गायकवाड अध्यक्षस्थानी होते. ग्रामसेवक रामभाऊ कदम, सरपंच मनोहर गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य दीपक देशमुख, पंचायत समिती सदस्य दगडू शिंदे, संजय नागटिळक, अण्णासाहेब देशमुख, रमण शेटे, आदी उपस्थित होते.

या सात दिवसीय शिबिरात विद्यार्थ्यांना तहसीलदार सदाशिव पडदणे, जलतज्ज्ञ अनिल पाटील, ॲड. रेखा वाघमारे, डॉ. जयंत करंदीकर, साधना करंदीकर, फुलचंद नागटिळक आदींनी मार्गदर्शन केले. कला गुणदर्शन कार्यक्रमाचे उद्‌घाटन माढा पोलिस स्टेशनचें सहायक पोलिस निरीक्षक अतुल भोस यांनी केले.

प्रा. जयवंत पालकर यांनी अहवाल वाचन केले. प्रेमचंद गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. स्वाती व्हनकडे यांनी सूत्रसंचालन केले.



उपळाई बुद्रूक (ता. माढा) : राष्ट्रीय सेवा योजनेच्या निरोप समारंभप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना भाजप जिल्हा उपाध्यक्ष दादासाहेब साठे. याप्रसंगी प्राचार्य पंजाबराव रोंगे, मनोहर गायकवाड आदी.

प्रा. अंकुश घुले यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रा. दिलीप घोलप, प्रा. प्रवीण शिंदे-पाटील व महाविद्यालयातील कर्मचारी, स्वयंसेवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# 3 Days Workshop on Leadership Development and Disaster Management

**19th Dec to 21st Dec 2019**



## माढा महाविद्यालयात सेवा योजनेची कार्यशाळा

**माढा, ता. १९ :** राष्ट्रीय सेवा योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व कला व वाणिज्य महाविद्यालय माढा यांच्यातर्फे नेतृत्व विकास व आपत्ती व्यवस्थापन विषयावरील तीनदिवसीय कार्यशाळेचे गुरुवारी (ता. १९) माढा महाविद्यालयात नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

मोडनिंब येथील मा. ह. महाडिक महाविद्यालय राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. सुहास पाटील अध्यक्षस्थानी होते. कार्यशाळेस माढा परिसरातील सात महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी नोंदणी केली. माढ्याचे नगर अभियंता गणेश बागल, प्रा. डॉ. सुभाष गायकवाड, प्रा. डॉ. संजय गायकवाड, प्रा. डॉ. अतुल कदम, प्रा. डॉ. विजय काळे, प्रा. मुळीक उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा. प्रेमचंद गायकवाड यांनी केले. प्रा. सौ. पैकेकरी व गणेश चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. जयवंत पालकर यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे, उपप्राचार्य प्रा. प्रकाश ताकभाते, प्रा. प्रताप उबाळे महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



माढा : माढा महाविद्यालयात नेतृत्व विकास व आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे, प्रा. सुहास पाटील, उपप्राचार्य प्रा. प्रकाश ताकभाते आदी.



दिव्य मराठी
सोलापूर, रविवार, २२ डिसेंबर २०१९
सोलापूर, रविवार, २२ डिसेंबर २०१९ | ४

## माढा महाविद्यालयात नेतृत्व विकास कार्यशाळा



प्रतिनिधी | माढा

माढा महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना, पु. अ. होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर व कला व वाणिज्य महाविद्यालय माढा यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय 'नेतृत्व विकास व आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा रयत महाविद्यालयात संपन्न झाली. कार्यशाळेचे उद्घाटन नगरपंचायतच्या नगराध्यक्षा ॲड. मीनल साठे यांनी केले. या कार्यशाळेत प्रा. सुहास पाटील प्रा. डॉ. सुशीलकुमार शिंदे यांनी राष्ट्र उभारणीसाठी नेतृत्व, प्रा. प्रदीप मोहिते यांनी आपत्ती व्यवस्थापनामध्ये व्यक्तिमत्त्व विकासाचे स्थान, संतोष कुमार काळे यांनी व्यक्तिमत्त्व विकास आणि आपत्ती व्यवस्थापन, विशाल बडे आणि ॲड. लक्ष्मण पाटील यांनी मार्गदर्शन केले. समारोप धनराज शिंदे, अध्यक्ष विक्रम सावंत पोलिस निरीक्षक भगवान खारतोडे यांच्या उपस्थितीत पार पडला. कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे, उपप्राचार्य प्रा प्रकाश ताकभाते यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा प्रेमचंद गायकवाड, प्रा. डॉ. जयवंत पालकर, प्रा. अशोक लोंढे आदीसह विद्यार्थी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

Valedictory Function

Inauguration Function